**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

क्र.संगाबाअवि/संपमूमं/100/2022
दिनांक :- 23/7/2022

**प्रती,**
**प्राचार्य/ संचालक, मॉडेल डिग्री कॉलेज/**
**विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग प्रमुख,**
**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी**
**संलग्नित सर्व महाविद्यालये**

**विषय : उन्हाळी 2022 परीक्षेपासून पुनर्मूल्यांकन, फोटोकॉपी(सॉफ्टकॉपी)तथा रिड्रेसल ची सुविधा सुरु करण्याबाबत.**

महोदय/ महोदया,

वरील विषयान्वये सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, **उन्हाळी 2022 परीक्षेपासून** विद्यार्थ्यांसाठी पुनर्मूल्यांकन, फोटोकॉपी (सॉफ्टकॉपी) तथा रिड्रेसल ची सुविधा सुरु करण्यात येत असुन, ज्या परीक्षा ऑनलाईन प्रणालीद्वारे संचालीत केल्या जातात (**BA, BCom, BSc, व Engg.**) त्या अभ्यासक्रमांशी संबंधीत सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन पुनर्मूल्यांकनाचे आवेदन **https://sgbau.ucanapply.com** ह्या संकेस्थळावरुन **दिनांक 27 जुलै 2022 वेळ 11.00 पासून सुरु करण्यात येत आहे.**

**त्याकरीता विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

(1) विद्यार्थ्याने त्यांचेकडील असलेल्या **User Id and Password (Student Log in** मधून) द्वारे पुनर्मूल्यांकनासाठी वरील संकेतस्थळावरुन ऑनलाईन आवेदन करावयाचे आहे. (ज्या विद्यार्थ्यांना युजर आयडी व पासवर्ड माहित नाही त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांनी युजर आयडी व पासवर्ड ची माहिती दयावी.)

(2) उपरोक्त ***link*** वर विद्यार्थ्यांनी (**BA, BCom, BSc, व Engg.**) Student Tab मधे click करुन Apply for Reassessment यावर click केल्यानंतर Course, Student Type , Semester यावर Search करुन त्यावर click केल्यावर विद्यार्थ्यास त्याचे सर्व विषय दिसतील. त्यापैकी एक किंवा दोन विषय निवडून Submit वर click करावे. त्यानंतर भरलेल्या आवेदनाची प्रिंट काढावी व सदर प्रिंट सोबत (Hard Copy) मुळ गुणपत्रिका, विद्यापीठ शुल्क पावती / Online SBI Collect/डिमांड ड्राफ्ट (प्रती विषय रु. 200/-) गोपनीय विभागामधे तातडीने स्वहस्ते किंवा पोस्टाद्वारे जमा करण्यात यावे.

(3) ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिका फोटोकॉपी (सॉफ्टकॉपी) साठी आवेदन करावयाचे आहे त्यांनी Student Tab मधे click करुन Apply for Photo Copy/ies (scanned answer book) साठी Click केल्यानंतर Course , Student Type , Semester यावर Search करुन click करावे. त्यानंतर सर्व विषय दिसतील. त्यापैकी एक किंवा दोन विषय निवडून Submit बटन वर click करावे. त्यानंतर भरलेल्या आवेदनाची प्रींट काढावी व सदर प्रिंट सोबत (Hard Copy) मुळ गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत किंवा ऑनलाईन प्रत, विद्यापीठ शुल्क पावती / Online SBI Collect/डिमांड ड्राफ्ट (प्रती विषय रु. 200/-) गोपनीय विभागामधे तातडीने स्वहस्ते किंवा पोस्टाद्वारे जमा करण्यात यावे.

(4) ज्या विद्यार्थ्यांना त्यांच्या **Log in** मधे उत्तरपत्रिका फोटोकॉपी (सॉफ्टकॉपी) प्राप्त झाली आहे, त्यांनी फोटोकॉपी मिळाल्यापासून 10 दिवसांपर्यंत त्याच **Log in** मधून Apply for Redressal वर click करुन उपरोक्त प्रमाणेच Redressal चे आवेदन Submit करुन त्याची प्रिंट काढावी व सदर प्रिंट सोबत (Hard Copy) मुळ गुणपत्रिका, विद्यापीठ शुल्क पावती / Online SBI Collect/डिमांड ड्राफ्ट (प्रती विषय रु. 200/-) गोपनीय विभागामधे तातडीने स्वहस्ते किंवा पोस्टाद्वारे जमा करण्यात यावे.

**तसेच**

**ऑनलाईन प्रणालीद्वारे संचालीत परीक्षांव्यतीरिक्त इतर सर्व परिक्षांसाठी विद्यार्थ्यांना www.redressal.sgbau.ac.in** ह्या संकेस्थळावरुन पुनर्मूल्यांकन, फोटोकॉपी तथा रिड्रेसल साठी आवेदन करावयाचे असून याबाबतची ***link* लवकरच सुरु करण्यात येईल.** सदर संकेतस्थळावर **Help For Online Application (ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मदत)** यामधे पुनर्मूल्यांकन, उत्तरपत्रिका फोटोकॉपी (सॉफ्टकॉपी), रिड्रेसल याबाबत विद्यार्थ्यांकरीता सविस्तर माहिती उपलब्ध आहे. त्याअनुषंगाने **Reassessment, Photocopy, Redressal** च्या ऑनलाईन आवेदनाकरीता त्या-त्या Field वर Click करुन ऑनलाईन आवेदन करण्यात यावे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे पुनर्मूल्यांकन आवेदनपत्र तथा उत्तरपत्रिका फोटोकॉपी (सॉफ्टकॉपी), रिड्रेसल याबाबत महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांना अवगत करुन दयावे.

***(टिप: (1) www.redressal.sgbau.ac.in ह्या संकेस्थळावरुन पुनर्मूल्यांकनाचे आवेदनची link लवकरच सुरु करण्यत येईल व त्यानुसार स्वतंत्र पत्राद्वारे आपणास कळविण्यात येईल.***

***(2) महाविद्यालयांनी Engineering 8th Semester च्या सर्व शाखांच्या गुणपत्रिका दि. 27 जुलै 2022 रोजी परीक्षा विभागामधून प्राप्त करुन घ्याव्यात.)***

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ